शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १७३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना येथील ड्रायपोर्ट लवकरच कार्यान्वित होणार


## माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे; ड्रायपोर्ट ची निविदा निघाली, महिनाभरात मालवाहतूक सुरु होणार

**जालना । प्रतिनिधी -** देशातील पहिला ड्रायपोर्ट जालना येथे उभारण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या कार्यकाळात तत्कालीन भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी तसेच माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांच्या पुढाकारातून मंजूर झाला होता. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवरचे टप्पे जवळपास पूर्ण झाले असून दोन दिवसांपूर्वीच केंद्रीय महामार्ग यंत्रणेमार्फत आलेल्या सहा निविदांपैकी विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. या कंपनीची निविदा स्वीकारल्याने ड्रायपोर्टवरून प्रत्यक्षात आयात निर्यातीस प्रारंभ होऊ शकतो.

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी ड्रायपोर्टच्या ऑपरेशन्स अँड मॅनेजमेंट संदर्भातील निविदा उघडण्यात आली. त्यामध्ये एल- १ म्हणून नागपूर येथील विकास कोल ण्ड मिनरल्स प्रा. लि. या कंपनीची निवड करण्यात आली आहे. सदरील कंपनी सोबत करार करून आठ दिवसांच्या आत कार्यारंभ आदेश देण्यात येणार असून, त्यानंतर एक ते दोन महिन्यात प्रत्यक्ष मालवाहतूक प्रक्रिया सुरू होईल.

जालना शहरालगत जवळपास चारशे एकर परिसरावर या ड्रायपोर्टची उभारणीचे काम सन २०१६ पासून सुरू झाले. प्रारंभी चारशे एकर जमीन संपादित करून त्याला संरक्षणभिंत बांधण्यात आली. मध्यंतरीच्या काळात रेंगाळलेला हा प्रकल्प ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी जेएनपीटी अर्थात जवाहरलाल नेहरू पोर्ट स्टच्या अधिकाऱ्यांना जालन्यात बोलावून प्रकल्पाला गती दिली. विशेष म्हणजे कस्टम क्लिअरन्स हा आयात आणि निर्यातीसाठी लागणारा महत्त्वाचा घटक याआधीच मंजूर झालेला आहे. आजघडीला ६४ एकरवर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असून जालना तालुक्यातील दिनेगाव ते ड्रायपोर्टपर्यंत स्वतंत्र रेल्वे रूळ अंथरलेले आहेत. आयात-निर्यातीसाठी मालधक्का देखील तयार आहे. मध्यंतरी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या ड्रायपोर्टचे व्हर्च्युअल उद्घाटन केले होते. त्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रावसाहेब दानवे, आ.अर्जुन खोतकर यांचीही उपस्थिती होती.

असे असले तरी विविध प्रशासकीय प्रक्रियामुळे हा प्रकल्प काही वर्ष प्रलंबित राहिला होता त्यामुळे प्रत्यक्षात या ड्रायपोर्टच्या माध्यमातून मालाची ने आण सुरू झाली नव्हती. त्यासाठी अनेक वेळा निविदा मागविण्यात आल्या. मध्यंतरी जेएनपीटी प्रशासनाकडून हा प्रकल्प केंद्रीय महामार्ग रस्ते विकास मंडळाकडे वर्ग करण्यात आला. याच मंडळाने या निविदा मागविल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी सहा पैकी विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. यांची निविदा मंजूर झाली असून या कंपनीकडून आता पुढील पंधरा वर्षांसाठी जालन्याचे ड्रायपोर्टचे संचालन करण्याची जबाबदारी राहणार आहे. यापोटी ही कंपनी एमएमएलपी अर्थात मल्टी मॉडेल लॉजेस्टिक पार्क या कंपनीला दरवर्षी एकूण उलाढालीच्या तुलनेत दीड कोटी रूपये देणार आहे. साधारणपणे महिनाभरात या कंपनीला ड्रायपोर्टचे संचालन करण्यासाठीचे प्रशासकीय मान्यता देऊन त्यांच्याकडून बँक गॅरंटी घेण्यात येणार आहे.



हा प्रकल्प केवळ जालना जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासाठी विकासाचे मोठे पाऊल ठरणार आहे. ड्रायपोर्ट कार्यान्वित झाल्यानंतर राज्यांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील मालवाहतुकीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. यामुळे लॉजिस्टिक्स खर्चात बचत होऊन कृषी व औद्योगिक उत्पादनांना स्पर्धात्मक दरात राष्ट्रीय व जागतिक बाजारपेठ उपलब्ध होईल. निर्यात प्रक्रिया सुलभ, जलद आणि खर्चिकदृष्ट्या परवडणारी होणार आहे.

सर्वांगीण प्रगतीकडे वाटचाल...
जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीस चालना देणारा हा ड्रायपोर्ट प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत असून, आगामी काळात जालना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार नकाशावर ठळकपणे स्थान निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**प्रत्यक्षात काम सुरू होणार असल्याचा आनंद- माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे**

जालन्यात ड्रायपोर्ट सुरू व्हावा म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसेच तत्कालीन केंद्रीय भूपृष्ठमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. विशेष म्हणजे जालन्यातील उद्योजकांनी दिल्लीत येऊन जालन्यासह मराठवाडा आणि विदर्भातील उद्योगांना तसेच शेतकऱ्यांना त्यांचा माल आयात निर्यात करण्यासाठी काहीतरी वेगळा प्रकल्प गरजेचा असल्याचे नमूद केले होते. त्यानंतर जालन्यात हा ड्रायपोर्टचा प्रकल्प मंजूर झाला. आज अनेक अडचणींवर मात करून साधारणपणे पुढील महिन्यात निविदा मंजूर केलेल्या विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. कडून प्रत्यक्षात कामाला सुरूवात होईल यात आता शंका राहिली नाही. त्यामुळे रोजगार उपलब्ध होण्यासह मोठ्या कंपन्यांसह शेतकऱ्यांना लाभ होईल याचे समाधान आणि आनंद आपल्याला आहे.

**विकासाला गती मिळेल - आशिमा मित्तल**

जालना येथील केंद्र सरकारचा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणून ड्रायपोर्टकडे पाहिले जात होते. आपण गेल्या सहा महिन्यांपासून त्याबाबत वरिष्ठ पातळीवर बोलण्यासह प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला. आता विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि या कंपनीची निविदा मंजूर झाल्याचे कळले आहे. त्यामुळे मोठा आनंद झाला असून जालन्यासह मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यांना या प्रकल्पामुळे मालाची आयात - निर्यात करण्यास मोठी मदत होणार आहे. - आशिमा मित्तल, जिल्हाधिकारी जालना

**उद्योग व शेतीला थेट लाभ..!**

जालना व परिसरातील स्टील उद्योग, बियाणे उद्योग तसेच विविध कृषी उत्पादनांना या प्रकल्पाचा थेट फायदा होणार आहे. ड्रायपोर्टमुळे कंटेनराइज्ड मालवाहतूक सुलभ होऊन निर्यात प्रक्रिया स्थानिक पातळीवर पूर्ण करता येईल. कमी खर्चात व जलद गतीने मालाची वाहतूक झाल्याने स्थानिक उद्योगांना इतर राज्यांतील तसेच परदेशातील कंपन्यांशी प्रभावी स्पर्धा करता येणार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे दार खुले होणार असून, त्यांना अधिक चांगला दर मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# आ. खोतकरांचा जनता दरबार

## शेतकरी, नागरिकांचे प्रश्न जागेवर सुटले



**जालना । प्रतिनिधी -** शासकीय अधिकारी आणि सामान्य जनतेत सुसंवाद साधत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आयोजित केलेल्या जनता दरबारात जालना मतदार संघातील शेतकरी आणि नागरिकांचे बहुसंख्य प्रश्न जागेवर सुटले. काही प्रश्न आणि समस्या विशिष्ट मुदतीत सुटणार असल्याची ग्वाही यावेळी देण्यात आली. दरम्यान, प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असणारे प्रश्न तात्काळ सुटल्याने शेतकरी, नागरिकांनी अत्यंत समाधान व्यक्त करीत, जनता दरबाराचा हा उपक्रम नित्य सुरू ठेवावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

प्रारंभी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, दप्तरदिरंगाई अथवा इतर कारणाने शेतकरी, नागरिकांचे प्रश्न प्रलंबित राहतात. परिणामी शासन, प्रशासन आणि जनतेत सुसंवाद राहत नाही. प्रश्न आणि समस्या सुटत नसल्याने अनेकदा नागरिक संताप व्यक्त करतात. त्यामुळे जिल्हास्तरावरील विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी, प्रमुख अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. यामुळे थेट प्रश्न आणि थेट उत्तर अशा स्वरूपात जनतेचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.*

**राज्य सरकारला अहवाल देणार**

जनता दरबाराच्या माध्यमातून किती प्रश्न सुटले, किती मार्गी लागले आणि कायदेशीर मार्गाने काही प्रश्न किती मुदतीत सुटणार आहेत, याबाबतचा अहवाल आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, त्या त्या खात्याचे मंत्री आणि सचिव यांना देणार आहोत. जनतेचे प्रश्न आणि समस्या शंभर टक्के सुटावेत, यासाठी आपला सतत पाठपुरावा राहणार असल्याचेही यावेळी आमदार खोतकर यांनी आवर्जून सांगितले. निवडून आल्यानंतर आपण विकासकामांचा धडाका लावला आहे. ही कामे करताना नागरिकांनी अनेकदा आपल्या समस्या आणि प्रश्न उपस्थित केले. प्रशासकीय पातळीवर होणारी दिरंगाई, विलंब आणि तांत्रिक अडचणीमुळे कामे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळेच अधिकारी आणि नागरिक यांच्यात सुसंवाद साधत जनता दरबार या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**नागरिकांच्या प्रश्नांवर जागेवर निर्णय**

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आयोजित केलेल्या या जनता दरबारात शेकडो नागरिकांकडून निवेदन आणि तक्रारींचा ढीग लागला. वीज वितरण कंपनी, महसूल विभाग, कृषी विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती, पोलीस खाते, आरोग्य विभाग, महानगरपालिका, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, लघु पाटबंधारे, समाज कल्याण, महिला व बालकल्याण विभाग, कामगार कल्याण विभाग, पाणीपुरवठा अशा सर्व विभागातील प्रश्न सरपंच,ग्राम पंचायत सदस्य, शेतकरी, नागरिक नगरसेवक अशा सर्वांनी बेडरपणे आपले प्रश्न पान २ वर

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांगतर्गत कार्यक्रम

# सिने अभिनेत्री रिंकू राजगुरू व अभिनेते भाऊ कदम उपस्थित राहणार

**जालना । । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांचे उद्घाटन, कामांची पाहणी, ग्रामस्थांशी संवाद, महिला बचत गट उपक्रमांना भेट, आरोग्य तपासणी शिबिरे, वृक्षारोपण तसेच शालेय उपक्रमांचे उद्घाटन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.





या कार्यक्रमांना विशेष आकर्षण म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील सिने अभिनेत्री रिंकू राजगुरू तसेच अभिनेते भाऊ कदम हे उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत दगडवाडी (ता. भोकरदन), मानेगाव, सावरगाव हडप (ता. जालना) तसेच आष्टी (ता. परतूर) येथील विविध विकासकामांची पाहणी करण्यात येणार असून ग्रामस्थांना या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमांद्वारे ग्रामपंचायतींच्या विकासकामांना गती देण्याबरोबरच नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या व सूचना जाणून घेण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) संदीप पवार यांनी केले आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान — जागर बदलाचा, समृद्ध महाराष्ट्राचा

जिल्हाधिकारी कार्यालयात माजी न्यायमुर्ती संदीप शिंदे यांनी घेतला कुणबी नोंदी व प्रमाणपत्र वाटपाचा आढावा

# प्रमाणपत्र प्रक्रिया सुलभ व गतिमान करण्याच्या सुचना

**जालना । प्रतिनिधी -** कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या स्वरूपाच्या आढळलेल्या नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्रे देण्यासाठी विहित कार्यपद्धती निश्चित करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. समितीचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात ही बैठक संपन्न झाली. या बैठकीत न्यायमूर्ती शिंदे यांनी जिल्ह्यातील कुणबी नोंदी शोधण्याच्या मोहिमेचा आणि आतापर्यंत वितरित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांचा, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा सविस्तर आढावा घेतला. तसेच जालना जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्रे देण्याची विहीत करण्यासाठी गठित समिती अध्यक्ष मा.न्यायमुर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या




प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान करण्याबाबत त्यांनी प्रशासनाला आवश्यक सूचना केल्या.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा आढळुन आलेल्या नोंदीच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यपध्दती अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार पान २ वर

# चिमुकल्या अदनानची जिद्द; वयाच्या ५ व्या वर्षी पूर्ण केला १३ तासाचा पहिला रोजा

**जालना । प्रतिनिधी -** पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, मुस्लिम बांधव मोठ्या श्रद्धेने उपवास (रोजा) ठेवतत आहेत. मात्र, सध्याच्या वाढत्या उन्हाचा तडाखा मोठ्यांनाही घाम फोडत असताना, जालना येथील एका पाच वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या जिद्दीच्या जोरावर आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. 'जलजला न्यूज'चे संपादक आमेर खान यांचा सुपुत्र अदनान आमेर खान याच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शुक्रवारी रमजान महिन्याचा दुसरा रोजा होता. अवघ्या पाच वर्षांच्या अदनानने पहाटेपासूनच रोजा धरण्याचा निश्चय केला. सकाळपासून ते सायंकाळी इफ्तारपर्यंत, म्हणजेच सलग १३ तास अन्नाचा एक कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता अदनान ने हा रोजा पूर्ण केला. लहान वयात दाखवलेली ही धार्मिक निष्ठा आणि संयम पाहून नातेवाईक थक्क झाले आहेत.



अदनानने आपला पहिला रोजा पूर्ण करताच त्याचे वडील आमेर खान आणि संपूर्ण कुटुंबियांनी त्याचे उत्साहात अभिनंदन केले. सोशल मीडियावरही या चिमुकल्या अदनानचे फोटो व्हायरल होत असून, 'एवढ्या लहान वयात एवढी जिद्द' अशा शब्दांत त्याचे कौतुक केले जात आहे.

जिद्द आणि श्रद्धा असेल तर वयाचं बंधन नसतं, हेच पुन्हा एकदा सिद्ध झालंय आपल्या जालन्यात! जिथे कडाक्याच्या उन्हात मोठ्या माणसांनाही तहान-भूक सहन होत नाही, तिथे पाच वर्षांच्या चिमुकल्या अदनान ने १३ तासांचा निर्जळी उपवास करून सर्वांनाच थक्क केलं. पवित्र रमजानच्या दुसऱ्या दिवशी, जलजला न्यूजचे संपादक आमेर खान यांचा मुलगा अदनान याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा मुकम्मल केला. पहाटेच्या सेहरीपासून ते सायंकाळच्या इफ्तारपर्यंत, अदनानने पाण्याचा थेंबही न पिता हा रोजा पूर्ण केला. या यशाबद्दल त्याच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण असून, नातेवाईकांकडून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# संपादकीय पान

## महान स्वातंत्र्यसेनानी...!

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची पुण्यतिथी आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा. २३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजाारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वंदे मातरमला दिलेल्या सर्वोच्च सन्मानाला विरोध करण्यासाठी कांग्रेसने गाठली खालची पातळी!

# दिल्ली सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात वंदे मातरम गीताच्या प्रदर्शन आणि सन्मानासाठी शासकीय निधी !

**नवी दिल्ली -** सनातन संस्थेने आपल्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत दिल्ली येथे ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ आयोजित केला होता. या निमित्ताने देशभरातील विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने देशभरातून हजारो हिंदुत्वनिष्ठ येणार असल्याने त्यांच्या समोर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या संकल्पनेनुसार ‘वंदे मातरम’चा गौरव व्हावा, या दृष्टीने सनातन संस्थेने वंदे मातरम् गीताचे भव्य प्रदर्शन तीन दिवस भारत मंडपमच्या शेजारील हॉल क्र. १२ मध्ये आयोजित केले होते. तसेच मुख्य कार्यक्रमात वंदे मातरमचे समूह गान आयोजित केले होते. त्याचबरोबर या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक शस्त्रे होती. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. मंत्र्यांच्या हस्ते करण्याचे निश्चित झाले होते आणि त्यासाठी नियमित शासकीय पद्धतीने आम्ही शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार सर्व प्रशासकीय मान्यता घेऊन शासनाने त्याला मान्यता दिली. या व्यतिरिक्त उर्वरित कार्यक्रम हा सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवाचा होता आणि त्याचे नावच ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ असे होते, त्यामुळे त्याला हिंदू राष्ट्राचा महोत्सव म्हणून खोटा प्रचार काँग्रेसकडून केला जात आहे, असे उत्तर सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिले आहे.

सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. वर्तक पुढे म्हणाले की, या कार्यक्रमात कोणतेही भारतीय संविधान विरोधी भाषण झाले नाही. सर्व वक्त्यांनी हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांची बाजू मांडली आणि त्यावर उपाययोजना सांगितल्या. प्रत्यक्षात कांग्रेसचे तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री घटनात्मक पदावर असताना कांग्रेस मतलब मुस्लिम और मुस्लिम मतलब कांग्रेस अशी घटनाविरोधी घोषणा करतात, कॉंग्रेसचे तत्कालीन प्रधानमंत्री इस देश की साधनसंपत्ती पर पहिला अधिकार मुसलमानो का है, असे वक्तव्य करतात. सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा नाकारूनही धर्माच्या आधारावर मुस्लिम समाजाला आरक्षण घोषित करतात, केरळमध्ये कॉंग्रेसचे नेते बीफ बैन ला विरोध करण्यासाठी रस्त्यावर गोहत्या करतात, हे सर्व संविधान विरोधी नाही का? त्यामुळे कॉंग्रेसने अगोदर स्वतः ची पापे बघावीत.

कॉंग्रेसने केलेले शिखांचे हत्याकांड आजही लोक विसरलेले नाहीत, तसेच बाटला हाऊसच्या आतंकवाद्यांसाठी अश्रू काढणे, मुंबई येथील २६/११च्या आतंकवादी हल्ल्यात कसाब आदी पाकिस्तानी आतंकवादी सहभागी असल्याचे पुरावे असताना कांग्रेसचे नेते २६/११ का हमला ठड्ड की साझिश या रा. स्व. संघाला दोषी ठरवणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशनाला उपस्थित राहतात. आतंकवाद शब्दाचा वापर करायला नको होता, मात्र पक्षाने सांगितले म्हणून केला. याच थियरीच्या आधारे सनातन संस्थेला ही खोट्या प्रकरणांत गोवण्यात आले होते. आमचा आम्हाला आतंकवादी संबोधणाऱ्या कांग्रेसच्या नेत्यांवर, तसेच संबंधित




कॉंग्रेसचे तत्कालीन गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी तर आता जाहिरपणे कबूल केले आहे की, मी हिंदू त्यांना ही हिंदूंना आतंकवादी ठरवण्याची थियरी कोणी सांगितली होती, याचा खुलासा कांग्रेस पक्ष का करत नाही? न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे; मात्र कोणत्याही प्रकरणात न्यायालयाने सनातन संस्थेला दोषी ठरवलेले नसतानाही, पोर्टलवर आम्ही बदनामीचे खटले दाखल करणार आहोत, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

# चितळी पुतळी फाटा येथील ‘दिपक कृषी सेवा केंद्र’च्या गोदामाला भीषण आग

## खते व कीटकनाशके खाक; ३५ ते ४० लाखांचे नुकसान

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील चितळी पुतळी फाटा येथे असलेल्या दिपक कृषी सेवा केंद्र या कृषी साहित्य विक्री दुकानाच्या गोदामाला आज दि. २० रोजी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सदर गोदामामध्ये मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते, कीटकनाशके तसेच विविध प्रकारची कृषी औषधे साठवून ठेवण्यात आली होती. पहाटे अचानक धूर निघत असल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ माहिती दिली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण गोदाम पेटून उठले. त्यामुळे गोदामातील सर्व साहित्य जळून खाक झाले.

दुकानाचे मालक दिपक भुतेकर आणि आकाश भुतेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, आग विझवण्यासाठी तात्काळ प्रयत्न करण्यात आले. मात्र ज्वालांची तीव्रता मोठी असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान टाळता आले नाही. या आगीत अंदाजे ३५ ते ४० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेला खत व कीटकनाशकांचा साठा नष्ट झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी स्थानिक पोलीस व महसूल प्रशासनाने भेट देऊन पंचनामा केला असून, घटनेची पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



### वाचकांचे मनोगत

## कोकणातील हापूस आंबा अस्मानी संकटातून बाहेर काढा

कोकणाचा हापूस आंबा जगप्रसिद्ध आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुके हापूस आंब्याची पंढरी म्हणून ओळखले जातात. हंगामात लाखो हापूस आंब्याच्या पेट्या नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमध्ये जातात.या हंगामातील हापूस आंबा अस्मानी संकटात सापडला आहे.म्हणून हापूस आंबा शेतकरी संघटीत होऊन शासन दरबारी आवाज पोहचण्यासाठी आंबा शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांनी देवगड जामसंडे येथील सांस्कृतिक भवनात बाधित हापूस आंबा शेतकरी व व्यापारी यांचा मेळावा आयोजित करून मार्गदर्शक म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हापूस आंबा शेतकरी संकटात सापडला आहे त्याला बाहेर काढण्यासाठी लढा देण्याचे संकेत राजू शेट्टी यांनी दिले आहेत.तर सिंधुदुर्ग जिल्हा पालकमंत्री नितेश राणे यांना देवगड तालुक्यातील आंबा व इतर फळबागा शेतकरी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नुकसान भरपाई मिळावी म्हणून निवेदन दिले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागायतदार व व्यापारी संघाने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी देवगड जामसंडे येथील सांस्कृतिक भवनात भव्य मेळावा आयोजित केला होता त्यावेळी एक हजार हून अधिक शेतकरी उपस्थित होते. दरवर्षी हापूस आंब्याच्या हंगामात शेतकरी ,बागायतदार हापूस आंब्याच्या झाडाला पौष्टिक आहार,खते, सेंद्रिय खते,साफ सफाई, औषधे फवारणी,देखभाल,कामगारांची मजूरी यावर लाखो रुपये खर्च करतो तो उत्पन्न मिळेल या आशेवर पण आशेची निराशा होऊन पाणी फिरले. शासन नुकसान भरपाई देताना एकरी किंवा हेक्टरी मदत जाहीर करते पण कोकणातील शेतकरी मुळातच तुटपुंज्या जागेचे मालक आहेत.त्याच्याकडे शासनाच्या धोरणानुसार जागा नाही म्हणून प्रती हापूस आंबा झाड प्रमाणात निकष लावून शेतकऱ्यांना दिलासा दिला तर अस्मानी संकटातून शेतकरी बाहेर येईल.आंबा उत्पादन मोठ्या प्रमाणात कोकणात तयार होते पण विक्री साठी शेतकरी प्रती पेटी पाचशे - सहाशे रुपये खर्च करून नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट मध्ये पाठवतो.हंगामाच्या सुरूवातीला चांगला दर मिळतो.मार्च - एप्रिल - हे महिन्यात दलालांकडून शेतकऱ्यांना तुटपुंज्या किंमत मिळते याचा शोध राजू शेट्टी शेतकरी संघटनेचे नेते यांनी शोध घ्यावा.तालुक्यात कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या बागांमध्ये जाऊन झाडांची पाहणी करून मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.तालुक्यात शासनाने मार्गदर्शन शिबिरे ,मेळावे आयोजित केले तर शेतकरी सुजाण होईल.जिल्ह्यात प्रयोगशाळा, हवामान खात्याने योग्य समय सुचकता दर्शविन्याची व्यवस्था करावी. तरच पुढे येणारे धोके टाळता येतील.शेतकर्यांचे होणारे नुकसान टाळता येईल.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

पान १ वरुन

## आ. खोतकरांचा ...

उपस्थित केले. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेत जागेवर प्रश्न सोडविले. तांत्रिक अडचणी अथवा न्यायालयीन अडचणीमुळे प्रलंबित असलेले प्रश्न विशिष्ट मुदतीत कागदपत्रांची पूर्तता करून मार्गी लावण्याचीही ग्वाही यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तसेच काही प्रश्न मंत्रालयीन पातळीवर सुटू शकतात, काही प्रश्नांसाठी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील, नवीन जीआर सुद्धा काढावे लागतील. असे प्रश्न आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, श्रीमती सुनेत्रा पवार यांच्यासह संबंधित मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सोडवू , अशी ठाम ग्वाही आमदार खोतकर यांनी दिली. प्रत्यक्ष जनतेच्या प्रश्नावर आगामी अधिवेशनातही आवाज उठवू असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पूर्ण वेळ देऊन समस्या निराकरणासाठी प्रयत्न केल्याने आ.खोतकर यांनी त्यांना धन्यवाद दिले. या बैठकीस शिवसेनेचे अन्य पदाधिकारी भास्करराव आंबेकर, अनिरुद्ध खोतकर, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, संतोष मोहिते आदी उपस्थित होते. तसेच उपविभागीय महसूल अधिकारी रामदास दौंड, उपविभागी पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, तहसीलदार छाया पवार, प्रकल्प संचालक सुनील पठारे, अधीक्षक जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कार्यकारी अभियंता बांधकाम सविता सलगर, कार्यकारी अभियंता महावितरण पेंसलवार, उप अभियंता जि प बांधकाम राजहंस, शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, वनपरिक्षेत्र अधिकारी निता फुले, गटविकास अधिकारी संदीप पवार, पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, संतोष साबळे, शेवाळे, उपअभियंता एमआयडीसी महावितरण राऊत राय, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील, तालुका भूमि निरीक्षक श्रीवास्तव, तालुका कृषी अधिकारी राठोड, मनपा अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, बांधकाम अभियंता शेख सऊद, नायब तहसीलदार शैलेश राजमाने, राजेंद्र निहाळ पाटील, उपायुक्त नंदा गायकवाड, मंडळ अधिकारी, तलाठी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, तांत्रिक सहाय्यक, ग्रामसेवक ररवळ कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रमाणपत्र प्रक्रिया ...

यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा प्रशासनाकडून दि.१८ फेब्रुवारी २०२६ अखेर कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा नोंदणी साठी विविध विभागांच्या अभिलेख्यांवरुन २२ लक्ष ७४ हजार ८२ तपासलेल्या नोंदी आहेत यामध्ये कुणबी जातीच्या एकुण ५०२७ नोंदी आढळुन आलेल्या आहेत. यामध्ये महसूल विभाग-२४५५, भुमि अभिलेख विभाग-१८४४, शिक्षण विभाग-९०, जिल्हा उपनिबंधक कार्यालय जालना- ४०३, महानगरपालिका (जन्म-मृत्यू नोंदी)-१८५, ग्रामपंचायती (जन्म-मृत्यू नोंदी)-१८५ आणि सेवा अभिलेखे सेवापट- ३ अशा एकुण ५०२७ कुणबी नोंदी आढळुन आलेल्या आहेत. मा .न्या.संदीप शिंदे (निवृत्त) समिती स्थापन झाल्यापासून जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यात आढळुन आलेल्या नोंदी व वाटप करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्रामध्ये जालना नोंदी ४२८ तर जात प्रमाणपत्रे ११५३, बदनापूर नोंदी १०२ आणि जात प्रमाणपत्रे १३१७, अंबड नोंदी २३८ तर जात प्रमाणपत्रे ३१४०, घनसावंगी नोंदी २९ तर जात प्रमाणपत्रे ४९४, भोकरदन नोंदी २७०९ तर जात प्रमाणपत्रे ५८९९, जाफ्राबाद नोंदी ४११ तर जात प्रमाणपत्रे ८८६, परतूर नोंदी तर जात प्रमाणपत्रे २०८८ आणि मंठा नोंदी ४५७ तर जात प्रमाणपत्रे १६८० मिळण्यासाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये परतूर तालुक्यात १ व मंठा तालुक्यात १८ असे एकुण १९ अर्ज नाकारलेले आहेत तर प्रलंबित अर्ज निरंक आहेत. दि.०२.०९.२०२५ च्या शासन निर्णयानूसार जिल्ह्यातील एकुण १०३३ ग्राम महसूल अधिकारी, सहायक कृषी अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. दि.०२.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानूसार हैद्राबाद गॅझेटीअर मधील नोंदी विचारात घेवून कुणबी, किंवा मराठा कुणबी किंवा कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वाटपात प्राप्त अर्ज १९३ आणि मान्य केलेले अर्ज ७४ तर नाकारलेले अर्ज ४ आणि प्रलंबित असलेले अर्ज ११५ आहेत. जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र वैधतेसाठी एकुण ११२ अर्ज दाखल झालेले असून पडताळणी समितीने ७४५ प्रमाणपत्र वैध ठरविले आहेत. अवैध २३ अर्ज ठरविले तर इतर कारणांनी निकाली १२३ अर्ज काढले सध्या पडताळणी समितीकडे २३१ अर्ज प्रलंबित आहेत. यात १ ते ९० दिवसातील १८७ तर ९० दिवसाच्यावरील ४४ अर्ज आहेत. अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने यावेळी देण्यात आली.

## जालन्यात छत्रपती शिवाजी महाराज चौकात तरुणाचे 'भीक मांगो' आंदोलन

### चौकाच्या सुशोभीकरणासाठी निधी देण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका तरुणाने 'भीक मांगो' आंदोलन केलं आहे. चौकाच्या सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. किरणराजे देशमुख असे आंदोलनकर्त्याचे नाव आहे.

आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी होत असताना शहरातील शिवाजी महाराज चौकातील पुतळ्याजवळील सुशोभीकरणाचे साहित्य नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने निधी देऊन नादुरुस्त साहित्याची दुरुस्ती करून चौकाचे सुशोभीकरण करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्याने केली आहे.

## डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूल मध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहामध्ये साजरी करण्यात आली यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील घटना वर प्रकाश टाकण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवरायांचा जन्म.. शिवरायांचे शिक्षण.. रायरेश्वर मंदिरावरील स्वराज्य स्थापनेची शपथ यावर नाटिका सादर करून सर्वांची मने जिंकले . शाळेतील विद्यार्थिनी कृष्णाली रुद्रकें व विद्या नांगरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा परिधान केली . यावेळी आराध्यां नीचल. श्रुती खामकर आरती उबाळे रिया पारखे . परी पाटोळे . ईश्वरी उबाळे साई उबाळे यां विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाळेतील शिक्षिका कुकडे विद्या. श्रीमती नसरीन सय्यद, भाग्यश्री पाटील, साधना काळे, कु. सनईकर त्रिवेनी, शेळके गजानन इत्यादी मेहनत घेतली.




## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जय बजरंग महा राज्याच्या वतीने साजरी



**जालना । प्रतिनिधी -** हिंदवी स्वराज्याचे शिल्पकार,अखंड हिंदुस्थानाचे रयतेचे राजे आणि लाखो जनतेचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जालना येथील जय बजरंग फाऊंडेशन चे जनसंपर्क कार्यालय व शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित जय बजरंग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विपुल भैया राय, संस्थापक उपाध्यक्ष विनोद भैया राऊत, जिल्हाध्यक्ष उमेश कुटे, शहराध्यक्ष किशोर कुरील, उमंग ढाळे, गणेश पवार, बबन दाभाडे,मनीष चंदनकर, काशी वैद्य, संतोष अंभोरे, युवराज कुरील, राजेंद्र यादव, सुशील यादव, व पदाधिकारी व शिवभक्तांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली.

## टेंभुर्णी जिल्हा परिषद शाळेत बालरंगोत्सव साजरा



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** जिल्हा परिषद दत्तनगर टेंभुर्णी येथे बाल रंगोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी श्री राम खराडे साहेब केंद्रप्रमुख हरकळ सर केंद्र शाळेचे मुख्याध्यापक श्री जाधव सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री योगेश गडकर मराठवाडा बजरंग दलाचे उपाध्यक्ष श्री अविनाश देशमाने ग्रामपंचायत सदस्य श्री पांडुरंग बोरसे ग्रामपंचायत सदस्य श्री प्रमोद उखर्डे श्री नितीन शिंदे श्री मंगेश वाणी श्री जीआर भिताडे सर श्री संजू कळंबे मुख्याध्यापिका मीना जामदार मॅडम लोखंडे मॅडम उगले मॅडम श्रीकृष्ण आव्हाळे सर संजीवनी क्लासचे श्री सतीश जाधव सर पालक चंद्रभान डोमाळे ज्ञानेश्वर वाघ शालेय समिती सदस्य श्री शंकर सोनसाळे पालक विष्णू गोफणे कैलास गोफणे संदीप भागवत श्री गणेश उखर्डे श्री सचिन पंडित श्री विलास दातार श्री दीपक शेजुळ व सर्व शालेय समिती सदस्य पालक माता-भगिनी व सर्व विद्यार्थी बालकलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते

## किडण्या निकामी झालेल्या युवकाला युगंधरच्या माध्यमातून ५३हजाराची मदत



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** शिराळा ता. जाफराबाद येथील अभिषेक प्रकाश पाटोळे या अठरा वर्षीय युवकाच्या दोन्ही किडण्या निकामी झालेल्या असून त्याच्या वैद्यकीय उपचारासाठी युगंधर प्रतिष्ठान च्या माध्यमातून संकलित करण्यात आलेली ५३६५० रुपये रक्कम सुपूर्द करण्यात आली. अभिषेकवर जालना शहरातील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. अभिषेक च्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची असल्यामुळे सामाजिक भान राखून युगंधर प्रतिष्ठानने सोशल मीडिया च्या माध्यमातून आर्थिक मदतीचे आवाहन केले होते.या आवाहनाला प्रतिसाद देत अवघ्या ३ दिवसात ५३६५० रुपये मदत जमा झाली होती.या मदतीमध्ये हनुमंतखेडा येथील जिजामाता विद्यालयाच्या सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांनी सहभाग घेत ९८०० रुपये जमा करून दिले.याशिवाय जिल्हा परिषद चे शिक्षक, खाजगी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांनी देखील सहभाग नोंदवला.यावेळी युगंधर चे अध्यक्ष विनोद कळंबे,प्रा डॉ अरुण आहेर,प्रकाश पाटोळे,श्री वाघ उपस्थित होते



# सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीतील दोन लॉजवर छापा

## १३ महिलांची सुटका, ७ जणांना अटक; अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष व स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना | प्रतिनिधी -** जालना शहरातील बसस्टॅन्ड रोडवरील वैष्णवी लॉज आणि मोक्ष लॉज येथे सुरू असलेल्या देहव्यापारावर पोलिसांनी शुक्रवारी (दि. २०) मोठी कारवाई केली आहे. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष (-HTU) आणि स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्तपणे टाकलेल्या या छाप्यात १३ पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, लॉज मालक व मॅनेजरसह ७ पुरुष आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत ही कारवाई झाल्याने सदर बाजार पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना असे अवैध धंदे दिसून येत नाही का? असा प्रश्न निर्माण झाला असून सदर बाजार पोलीसांचे यात काही आर्थिक हितसंबंध आहे का? अशा ही चर्चांना उधाण आले आहे.

**अशी झाली कारवाई**

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, बसस्टॅन्ड रोडवरील संबंधित लॉजमध्ये आर्थिक फायद्यासाठी महिलांकडून अनैतिक देहव्यापार करून घेतला जात होता. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या सूचनेवरून, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी छापा टाकला.

**अटक केलेले आरोपी**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खालील आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे: सचिन नंदु पवार (वय ३०): मोक्ष लॉजचा मालक, संतोष भोलेनाथ जाधव: मोक्ष लॉजचा मॅनेजर, कैलास रतन कुमार (वय ३०): वैष्णवी लॉजचा मॅनेजर, पंकज भाऊसाहेब निकाळजे (वय २५):ग्राहक, तुषार हरिश बत्रा (वय २४): ग्राहक, रोहीत संजय बोर्डे (वय २६): ग्राहक, करण रवी वाहुळे (वय २०): ग्राहक.

**पिडीत महिलांची सुटका आणि जप्त मुद्देमाल**

सुटका करण्यात आलेल्या १३ महिलांपैकी ६ महिला पश्चिम बंगालमधील, ३ महिला आसाममधील तर ४ महिला छत्रपती संभाजीनगर येथील आहेत. कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ८१,७५० रुपये रोख आणि इतर साहित्य असा एकूण मुद्देमाल जप्त केला आहे.

**गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया**

या प्रकरणी पोलीस ठाणे सदर बाजार येथे 'महिलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६' च्या कलम ३, ४, ५ आणि ६ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, परि. पोलीस अधीक्षक श्रीमती जान्हवी शेखर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या पथकात ए.एच.टी.यू. चे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, रवी जोशी, संजय गवळी यांच्यासह दिपक घुगे, आक्रुर धांडगे, शुभम राठोड आणि महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.



# आंतरराज्य घरफोडी, चोरी करणारा कुख्यात गुंड गोंदी पोलीसांच्या जाळयात

**जालना । प्रतिनिधी -** कर्नाटक राज्यातील बेळगावी जिल्ह्यातील हारुगीरी पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या घरफोडी व चोरी प्रकरणातील कुख्यात आरोपीस गोंदी पोलिसांनी अटक करून कर्नाटक पोलिसांच्या ताब्यात दिल्याची कारवाई नुकतीच पार पडली आहे.




गुरन क्र. ५२/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३(५) बी.एन.एस. अंतर्गत घरफोडी व चोरी प्रकरणातील टोळीतील आरोपी रवी आन्ना शिंदे (वय २८, रा. नवीन सिरसगाव, ता. अंबड, जि. जालना) हा गोंदी हद्दीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन गोंदीचे प्रभारी अधिकारी स.पो.नि. आशिष खांडेकर यांनी तत्काळ पथकासह हालचाल केली. कर्नाटक पोलिसांच्या पथकाशी समन्वय साधून शहापूर परिसरात सापळा रचण्यात आला. दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आरोपी रवी शिंदे यास ताब्यात घेण्यात आले. पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी त्यास कर्नाटक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

**विविध ठिकाणी गंभीर गुन्ह्यांची नोंद**

सदर आरोपीवर राज्यातील विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून त्यामध्ये प्रामुख्याने दरोडा, घरफोडी व चोरीचे गुन्हे समाविष्ट आहेत. त्यातील काही गुन्हे पुढीलप्रमाणे - गु.र.न. १९७/२०२३ कलम ४३९, ३९५, ३९७ - बीड, महाराष्ट्र, गु.र.न. ३००/२०२४ कलम ३९५, गु.र.न. ५५/२०२२ कलम ३९५, ३९९ - पोलीस ठाणे गोंदी, जालना, गु.र.न. १९६/२०२१ कलम ३९५ भा.द.वि. - पोलीस ठाणे अंबड, जि. जालना, गु.र.न. १०१/२०२२ कलम ३९५ भा.द.वि. - पोलीस ठाणे गोंदी, जालना, गु.र.न. ३००/२०२४ कलम ३१०(२), ३०९(५), ३०९(६) - पोलीस ठाणे करमाड, छत्रपती संभाजीनगर, गु.र.न. २४६/२०२१ कलम ३९५ भा.द.वि. - पोलीस ठाणे अंबड, गुरन ५२/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३(५) - हारुगीरी पोलीस स्टेशन, बेळगावी, कर्नाटक, वरील गुन्ह्यांवरून आरोपी हा आंतरराज्य स्तरावर कार्यरत असलेल्या घरफोडी व दरोडा टाकणाऱ्या टोळीतील सक्रिय सदस्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पोलिसांची संयुक्त कारवाई**

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक, जालना तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गोंदी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो.नि. आशिष खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि मुपडे, पोउपनि हावले, पोउपनि जंगले, पोका/१७ भोजने, पोका/९७७ हावाळे, पोका/१६७७ गायकवाड, पोका/१४ सिद्दीकी यांनी कर्नाटक पोलीस पथकासह समन्वयाने ही धाडसी कारवाई केली.

या कारवाईमुळे आंतरराज्य घरफोडी टोळीवर मोठा आळा बसला असून, संबंधित जिल्ह्यांतील प्रलंबित गुन्ह्यांच्या तपासाला गती मिळणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीकडून पुढील तपासात आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# शिवजयंती निमित्त वरूड बु येथील जाधव हॉस्पिटल यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिर संपन्न



**विशाल देशमुख**

**जाफराबाद =** शिवजयंती निमित्त जाफराबाद तालुक्यातील वरूड बु येथील शिवजयंती उत्सव समितीच्या व जाधव हॉस्पिटल वरूड बु यांच्यावतीने रक्तदान शिबिर आयोजित करून छत्रपती शिवाजी महाराजांना एका वेगळ्या प्रकारे मानवंदना देण्यात आली. वरूड बु येथील शिवजयंती उत्सव समिती व जाधव हॉस्पिटल यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने शिवजयंती निमित्त गुरुवार (दि.१९) महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर जाधव हॉस्पिटल च्या प्रांगणात पार पडले. या महारक्तदान शिबिरात ४२ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. या उपक्रमाला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष करून विद्यार्थिनी व महिला यांनीही या उपक्रमात सहभाग घेऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. शिवजयंती उत्सव समिती व जाधव हॉस्पिटल वरूड बु यांच्या ह्या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.

# ना जातीचे, ना धर्माचे, शिवाजी राजे रयतेचे!

जालना । प्रतिनिधी - येथील तक्षशिला बौद्ध धम्म बहुउद्देशीय सेवाभावी संस्था समर्थ नगर मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ते डॉ.बसवराज कोरे म्हणाले की नवस्वराज्य, नवा विचार, नवा माणूस घडवणाऱ्या मानवतावादी छत्रपती शिवरायांचे विचार महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज यांनी पुढे नेले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हेच विचार संविधानात उतरवले.छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा म्हणजे भारतीय संविधानाचा आदर करणे होय. तसेच नवनिर्वाचित नगरसेविका रीमाताई खरात म्हणाल्या की छत्रपती शिवाजी महाराजांचा अष्टपैलू पराक्रम केवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या कणाकणात रुजला आहे. रयतेच्या उद्धारासाठी त्यांनी केलेल्या महाकाय कर्तृत्वाचा परिचय सर्वांना माहित आहे. छत्रपती शिवाजी महाराज कोण्या एका धर्माचे किंवा जातीचे नाहीत तर ते सर्वांचे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती बुद्ध विहारातच नाही तर प्रत्येक मंदिरामध्ये साजरी केली जावी. प्रमुख व्याख्याते डॉ. बसवराज कोरे व कार्यक्रमाचे अध्यक्ष नाना भोसले तसेच तक्षशिला बुद्ध




विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून भिकाजी साळवे यांनी डॉ. बसवराज कोरे यांचे स्वागत केले. संबोधी इंगोले हिने एकच राजा इथे जन्माला हे अभिवादन पर गीत सादर केले.तसेच नवनिर्वाचित नगरसेविका ड.रीमाताई खरात यांचे स्वागत छायाबाई साळवे यांनी केले. महेंद्र साळवे यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून दरवर्षी हा उपक्रम राबविण्यासाठी आवाहन केले. यावेळी संभाजी कांबळे, किशोर साळवे, अशोक गंगावणे, अर्चना कांबळे, धनश्री पगारे, रंजीत गायकवाड, मिनाबाई शरणागत, चंद्रकांत वाघमारे, विशाल वाघमारे , सर्व उपासक उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप इंगोले तर आभार प्रदर्शन डॉ. निहाळ यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी ही एक प्रेरणा - प्रा.संदीप पाटील

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख हे होते तर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ. सुनील मेढे यांची प्रमुख उपस्थिती होती. एक दुग्ध शर्करा योग म्हणून प्रा.एस.एम. पाटील यांचे वडील मोहनराव पाटील यांचीही विशेष उपस्थिती होती. प्रारंभी महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रा.एस.एम.पाटील यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचे महत्त्व श्रोत्यांना पटवून दिले. त्यांनी सांगितले की, शिवाजी महाराज हे केवळ योद्धे नव्हते, तर ते आदर्श प्रशासक, न्यायप्रिय राजा आणि स्वराज्याचे संस्थापक होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची मुत्सद्यगिरी या विचारांची प्रेरणा घेऊन रयतेनेही आपल्या जीवनात शिस्त, धैर्य आणि देशभक्ती जोपासली होती, रयत सुखी समाधानी आणि भयमुक्त जीवन जगत होती असे आपल्या भाषणात प्रा.पाटील यांनी श्रोत्यांना सांगितले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्रा.डॉ.रमेश देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वावर शौर्यावर तसेच त्यांच्या उत्तम प्रशासनावर व स्त्रियांच्या सन्मानाबद्दल सर्वधर्मसमभाव व न्यायप्रिय शासन व्यवस्था असे सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील मूल्यशिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो.डॉ.संतोष पहारे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.सुनंदा सोनुने




यांनी मानले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा.अनिल वैद्य, सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे महाविद्यालयात उत्साहाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाशिवरात्री जीवनातील अंधार आणि ज्ञानवर आता करण्याचा दिवस - हभप विठू माऊली

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची महादेव मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी महाशिवरात्रीचे विशेष महत्त्व टेंभुर्णीचे पुरोहित विठू महाराज यांनी असे सांगितले की हा सण शिव आणि पार्वतीच्या लग्नाचे स्मरण करतो या आणि याप्रसंगी शिव त्याचे दैवी तांडव नृत्य करतात हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे जो जीवनात आणि जगामध्ये अंधार आणि ज्ञानावर मात करण्याचे स्मरण आहे या दिवशी शिवाचे स्मरण करतात आणि प्रार्थना उपास नैतिकता आणि सद्गुणाचे मनन करून साजरा केला जातो पौराणिक कथेनुसार शिवलिंग या दिवशी प्रकट झाले होते तेव्हापासून शिवलिंगाला महाशिवरात्रीच्या दिवशी महा अभिषेक पूजन करतात यावेळेस शिवरात्रीला टेंभुर्णी आणि परिसरामध्ये विशेष भक्तीमय वातावरण दिसून आले टेंभुर्णी परिसरात जवळपास ११ महादेवाचे देवालय आहेत पुरोहित विठू महाराज यांनी असे सांगितले की सकाळी पाच वाजल्यापासून सायंकाळी सात वाजेपर्यंत सर्वच परिसरातील महादेव नंदी मंदिरामध्ये शंभर ते ११० महा अभिषेक पूजन करण्यात आले यावेळी बरेच मंदिरामध्ये फराळाची विशेष व्यवस्था भाविक भक्तांनी केली होती मोठ्या उत्साहवर्धक वातावरणामध्ये शिवरात्री या महासनाचे विशेष महत्त्व दिसून आले भाविकांनी यावेळी प्रार्थना केली की वरून राजाची कृपा आमच्यावर राहू द्या यावेळी महादेव पार्वती यांना प्रार्थना केली की संपूर्ण राष्ट्राचा संरक्षण नैसर्गिक आपत्ती पासून करा सुख समृद्धी भरभराटी सर्व भारतावर राहू द्या बळीराजा सुखी राहू द्या

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.